बेरोजगार अभियंता यांना
कंत्राटी कामे देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शा.नि.क्र. सीएटी १०९७/प्र.क्र.४२/इमारती २
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :-२० ऑक्टोबर २००३.

**वाचावे** - १) शा.नि.क्र.सीएटी १०९०/सीआर २१/इमा.२, दि.२ फेब्रुवारी,१९९६
२) शा.नि.क्र.सीएटी १०९६/सीआर ३४८/इमा.२, दि.३ मार्च,१९९७
३) शा.नि.क्र.सीएटी १०९६/सीआर १७२/इमा.२, दि.२० एप्रिल,१९९८
४) शा.नि.क्र.सीएटी १०९७/सीआर ४२/इमा.२, दि.४ मार्च,१९९९
५) शा.नि.क्र.सीएटी १०९७/सीआर ४२/इमा.२, दि.२९ जुलै २००२.
६) शा.नि.क्र.सीएटी १०९७/सीआर ४२/इमा.२, दि.२५ ऑक्टोबर २००२.

**प्रस्तावना** - शासन निर्णय दि.२५ ऑक्टोबर २००२ अन्वये नोंदणी झाल्यानंतर ज्या स्थापत्य अभियंत्यांनी रु. ५.०० लक्षपर्यंतचे एक किंवा तेवढया किंमतीची दिलेले कामे यशस्वीपणे पूर्ण केली आहेत त्यांना त्यापुढे रु. २५.०० लक्षपर्यंतची अशी एकूण रु. ३०.०० लक्ष किंमतीपर्यंतची कामे विनास्पर्धा देणेबाबतची सवलत दिलेली आहे. अशा प्रकारे विना स्पर्धा रु.३०.०० लक्ष किंमतीपर्यंतची कामे देण्याची मर्यादा वाढविणेबाबतची मागणी विविध बेरोजगार अभियंता संघटनांनी शासनाकडे केली आहे. त्यावर शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करुन खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय** - ज्या स्थापत्य बेरोजगार अभियंत्यांनी रु. ५.०० लक्षपर्यंतचे एक किंवा तेवढया किंमतीची दिलेली कामे यशस्वीपणे पूर्ण केली आहेत, त्यांना तद्नंतर रु.३५.०० लक्षपर्यंतच्या किंमतीची तीन किंवा अधिक अशी एकूण रु.४०.०० लक्ष किंमतीची कामे विनास्पर्धा देण्यात यावीत. बेरोजगार अभियंत्यांना काम वाटप करताना त्यांना कंत्राटदार नोंदणी वर्ग ६ साठीच्या मर्यादेपर्यंत म्हणजे रु. १५.०० लक्ष किंमतीपर्यंतचे काम देण्यात यावे.

हे आदेश पाटबंधारे विभाग तसेच आंतर वित्तीय सल्लागार व उप सचिव यांच्या सहमतीने काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( शि. वि. तामखडे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा. मुख्यमंत्री, ह्यांचे प्रधान सचिव,
मा. मंत्री (सा.बां.)/पाटबंधारे ह्यांचे खाजगी सचिव,

मा. राज्यमंत्री (सा.बां.)/पाटबंधारे ह्यांचे खाजगी सचिव,
वित्त विभाग/सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर,
महालेखापाल, लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
सचिव (रस्ते)/सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, ह्यांचे स्वीय स्आहाय्यक,
पाटबंधारे विभाग, मंत्रालय,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,

प्रत, माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी,

सर्व मुख्य अभियंते, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग,
मुख्य अभियंता, बृहन्मुंबई क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई, महाराष्ट्र,
गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा), मुंबई,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (सिडको), निर्मल बिल्डीग, नरीमन पॉइंट, मुंबई/महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई,
पाटबंधारे विकास महामंडळ, कृष्णा/तापी/गोदावरी/विदर्भ,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई,
आयुक्त, सर्व महानगरपालिका (२ प्रतींसह),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषदा,
अधीक्षक अभियंता, व प्रादेशिक अधिकारी, भूपृष्ठ वाहतूक मंत्रालय (MOST),चेंबूर, मुंबई,
सर्व अधीक्षक अभियंते, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग,
अधीक्षक अभियंता, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी, मुंबई/महानगरपालिका,ठाणे/पुणे/कल्याण,
संचालक, उपवने आणि उद्याने, मुंबई,
प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंते,सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग/जिल्हापरिषद,
सर्व अधिकारी/कार्यासन अधिकारी,सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग, मंत्रालय,
कार्यासन इमारती-२ (निवड नस्ती).